# गुंतवणूक करतांना टाळा ह्या 5 चुका

तुमच्या पोर्टफोलिओची दिवसेंदिवस वाढ करण्यासाठी तुम्हाला त्यात सातत्याने वाढ असणारे स्टॉक आवश्यक आहेत. परंतु प्रत्येक वेळी आपण योग्य निर्णय घेतो असे नाही आणि त्यामुळे गुंतवणुकीचे नुकसान देखील होऊ शकते. अनुभवी गुंतवणूकदार देखील स्टॉक्स मध्ये गुंतवणूक करतांना चुका करतात. गुंतवणूक करताना लोक करत असलेल्या काही सामान्य चुका आणि त्या कश्या टाळल्या पाहिजेत या बाबत थोडे जाणून घेऊया:

1. **अनियोजित गुंतवणूक** - ही गुंतवणुकीची चूक टाळण्यासाठी सर्वात सोपा मार्ग म्हणजे तुमची उद्दिष्टे ठरवणे आणि ते साध्य करण्यासाठी योजना बनवणे. तुम्ही गुंतवणूक करू इच्छित असलेल्या स्टॉकची प्रत्येक माहिती तपासा आणि मगच त्यात गुंतवणुकीचा विचार करा.

2. **आवडत्या कंपन्या**- ज्या कंपनीमध्ये तुम्ही गुंतवणूक केली आहे त्या कंपनीबाबत भावनिक होणे आणि आपण गुंतवणूक म्हणून शेअर्स खरेदी केले याकडे दुर्लक्ष करणे खूप सामान्य आहे. तुम्ही हा स्टॉक नफा मिळवण्यासाठी खरेदी केला आहे हे कधीही विसरू नका. तुम्ही गुंतवणूक केलेल्या कंपनीच्या नफा नुकसान वेळेनुसार बदलत असल्यास योग्य वेळी शेअर्सची विक्री करून नफा मिळविणे उत्तम ठरते.


----------------------------------------------------------------

शेअर मार्केटचे अपडेट व नॉलेज कंटेंट वेळोवेळी मिळविण्यासाठी आजच खालील लिंक वरुण Telegram चॅनल जॉइन करा.

https://t.me/shambhurajkhamkar

----------------------------------------------------------------


3. **वैविध्यपूर्ण पोर्टफोलियो नसणे**- बऱ्याच वेळा आपण दीर्घकालीन प्रॉफिट कडे दुर्लक्ष करून केवळ नफा कमावणाऱ्या कंपन्यांवर लक्ष केंद्रित करतो. परंतु दीर्घकालीन प्रॉफिट मिळविण्यासाठी पोर्टफोलियो मध्ये विविध सेक्टरचे स्टॉक्स असणे महत्वपूर्ण असते ज्याची सातत्य पण स्थिर वाढ आहे. उदाहरणार्थ FMCG सेक्टर.

4. **अनिश्चित फोकस**- कोणत्याही शेअरमध्ये गुंतवणूक करताना आपण अनेकदा अल्पकालीन किंवा दीर्घकालीन नफ्यासाठी आपले ध्येय निश्चित करणे विसरतो आणि अस्पष्ट दृष्टिकोणामुळे आपल्याला त्यात नुकसान सहन करावा लागू शकते.
5. **FOMO गुंतवणूक**- आपण अनेकदा स्टॉकमध्ये गुंतवणूक करतो जेव्हा ते त्यांच्या ऑल टाइम हाय म्हणजेच उच्चांक वर असतात कारण आपल्याला रॅली गमावण्याची भीती असते व घाई गरबडीत ही गुंतवणूक केली जाते किंवा कंपनीशी संबंधित कोणत्याही व्हिडिओ किंवा बातम्यांमुळे प्रभावित होऊन केली जाते. त्यामुळे अधिकृत व विश्वासू माहिती मिळाऊनच गुंतवणूक करणे योग्य ठरते.

गुंतवणूक करताना या गोष्टी नेहमी लक्षात ठेवा आणि नुकसान कमी करण्यासाठी त्या टाळा. जर तुम्ही ह्या 5 गोष्टीवर लक्ष दिले नाही तर तुम्हाला काहीवेळा गुंतवणूक करणे अवघड असू शकते आणि मोठ्या लॉसला सामोरे जावे लागू शकते.

अपडेटेड राहण्यासाठी आणि शेअर मार्केटबद्दल नवनवीन संकल्पना जाणून घेण्यासाठी आजच आमच्या YouTube चॅनेलला भेट द्या:

https://www.youtube.com/@SHAMBHURAJKHAMKAR

© Shambhuraj Khamkar Trading Academy

अर्थसाक्षरतेतून समृद्धीकडे

Call Us On: 8802809090